# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 12 October 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १२ ऑक्टोबर २०२५ दुपारी १.०० वा.

****

विकसित भारत बिल्डथॉन राष्ट्रीय स्पर्धा उद्या आयोजित करण्यात आली आहे. देशभरात शालेय विद्यार्थ्यांमध्ये नवोन्मेष –रचनात्मकतेला प्रोत्साहन देण्यासह स्वदेशी, आत्म निर्भर भारत, व्होकल फॉर लोकल आणि समृद्ध भारत या संकल्पनांवर आधारित ही अभिनव स्पर्धा आहे. थेट सजीव प्रसारण अर्थात लाईव्ह स्ट्रीमिंगद्वारे भारतभरातील शाळांमधील विद्यार्थांचे संघ आपल्या विशेष प्रकल्पांसह संबंधीत कार्यक्रमात ऑनलाईन पध्दतीनं सहभागी होत आहेत. या माध्यमातून जागतिक स्तरावर समस्या सोडविण्याचे व्यासपीठ विद्यार्थ्यांना उपलब्ध होणार आहे.तसेच या स्पर्धेत बक्षीसही मिळणार आहे. या स्पर्धेत सहावी ते बारावीचे विद्यार्थी सहभागी झाले आहेत.

****

रत्नागिरी जिल्ह्यातल्या मंडणगड इथल्या तालुका दिवाणी आणि फौजदारी न्यायालयाच्या नव्या इमारतीचं  उद्घाटन आज सकाळी सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या हस्ते झालं.याप्रसंगी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे ,उद्योगमंत्री उदय सामंत यांसह अन्य मान्यवरही उपस्थित होते.

****

लातूर तसंच छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषद आणि पंचायत समिती आरक्षण सोडत उद्या काढण्यात येणार आहे. हिंगोली जिल्ह्यातील बाकी असलेल्या काही पंचायत समितींची आरक्षण सोडतही उद्या जाहीर होईल. धाराशिव जिल्ह्यातील पंचायत समिती सदस्य पदांचं आरक्षणही उद्या जाहीर होणार आहे.

****

मुंबई इथं आज एन.एस.जी.– राष्ट्रीय सुरक्षा रक्षक दलाच्या २६ विशेष तुकडीतर्फे सायक्लेथॉन अर्थत सायकलफेरी काढण्यात आली. सशक्त भारत अभियान आणि

कर्करोग जनजागृतीसह एन.एस.जी.चा असलेल्या स्थापना दिवसाच्या अनुषंगानं आणि २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यात शहीद अशोक चक्र प्राप्त मेजर संदीप उन्नीकृष्णन यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. एन.एस.जी.च्या अडीचशे कर्मचाऱ्यांनी यात सहभाग नोंदवला.

****

धाराशिवच्या भूम तालुक्यातील बेलगाव पिंपळगाव येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने खासदार अरविंद सावंत यांच्या हस्ते मराठवाड्यातील पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी मीठ, धान्य, व इतर आवश्यक जीवनावश्यक वस्तूंचे संच वितरीत करण्यात आले. यावेळी खासदार ओम राजे निंबाळकर, आमदार कैलास पाटील, जिल्हाप्रमुख रणजीत पाटील, तालुका प्रमुख अनिल दादा शेंडगे, उपजिल्हा प्रमुख चेतन बोराडे यांची प्रमुख उपस्थिती होती. हा उपक्रम महानगर टेलिफोन निगम कामगार संघ, स्थानिक लोकाधिकार समिती, आणि जाणीव ट्रस्ट यांच्या सहकार्याने यशस्वी झाला. कार्यक्रमादरम्यान शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या समस्यांचा आढावा घेण्यात आला.

****

अतिवृष्टीमुळे नुकसानीला सामोरे जाणाऱ्या परांडा तालुक्यातील पूरग्रस्त बांधवांसाठी मायमराठी फाउंडेशन, नवी मुंबई तर्फे मानवतेचा आदर्श घालून देण्यात आला आहे. धाराशिव जिल्ह्यातल्या परांडा तालुक्यातील शेळगाव, देऊळगाव, बंगालवाडी, भोत्रा या गावांमध्ये जीवनावश्यक ६०० वस्तूंचे संच तसेच जिल्हा परिषद शाळांमध्ये २५० शालेय साहित्य संच वाटप करण्यात आले. संस्थापक अध्यक्ष मंगेश मिस्कीन, उपाध्यक्ष अनिल शिंदे आदींसह सदस्यांनी यात सहभाग घेतला.

****

राज्यासह देशभरात चांदीचं प्रमुख व्यापारी केंद्र आणि सिल्वर सिटी म्हणून प्रसिद्ध असलेल्या बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव इथं चांदीचा भाव लागोपाठ दोन-तीन दिवसांत एकंदर १४ हजारांनी वाढून सद्यस्थितीत एक किलोसाठी चांदीचा भाव एक लाख ७२ हजार रुपयांवर पोहोचला आहे. असं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. विशेष म्हणजे चंद्रयानातही खामगावमधील चांदीचे मोठे-भक्कम गज वापण्यात आले होते. इथं वेगवेगळ्या ठिकाणाहून चांदी खरेदीसाठी ग्राहक येत असल्याचं व्यापाऱ्यांनी सांगितले.

****

राज्यातल्या पाच समुद्र किनाऱ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचं 'ब्लू फ्लॅग मानांकन' प्रमाणपत्र मिळालं आहे. महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी याबाबत माहिती जाहीर केली.

जागतिकस्तरावर स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरण पुरक समुद्र किनाऱ्यांना डेन्मार्कच्या फाऊंडेशन फॉर एन्व्हायरन्मेंटल एज्युकेशन संस्थेकडून ३३ निकषांच्या मूल्यमापनातून हे मानांकन मिळतं. पर्यावरण शिक्षण, जल गुणवत्ता, सुरक्षा आणि पर्यावरण व्यवस्थापन यांसह सेवा- सुरक्षा या घटकांचा यात समावेश असतो. या यादीत रायगड जिल्ह्याच्या श्रीवर्धन आणि नागावसह, पालघरमधील पर्णका, तसंच रत्नागिरी जिल्ह्याच्या गुहागर आणि लाडघर या किनाऱ्यांचा समावेश आहे.

****

राज्यांसह केंद्र शासित प्रदेशातील शाळांनी प्रवेशासह परीक्षा शुल्क जमा करून घेण्यासाठी यु.पी.आय. अर्थात एकीकृत भरणा प्रणालीचा अवलंब करण्याचं केंद्रीय शिक्षण मंत्रालयानं सूचित केलं आहे. याद्वारे प्रशासकीय प्रक्रियांचं आधुनिकीकरण तसंच, एन.सी.ई.आर.टी., सी.बी.एस.ई., के.वी.एस. आणि एन.वी.एस. अशा विविध स्वायत्त शिक्षण मंडळांतर्गत शाळांमधील आर्थिक देवाण-घेवाणीला सुव्यवस्थित करण्याचा यु.पी.आय. वापराचा उद्देश आहे. विद्यार्थ्यांना संबंधित विविध शैक्षणिक शुल्क भरणा सहज सोपा होऊन डिजिटल स्वरूपातील सशक्त आणि सर्वसमावेशक  शिक्षण प्रणालीच्या दृष्टिनं असं करणं उपयुक्त ठरणार आहे.

****

राज्यात, जमीन मोजणीचा निपटारा आता तीस दिवसांतच होणार आहे. महसूल विभागानं यासाठी परवानाधारक खाजगी भूमापकांच्या नियुक्तीचा निर्णय घेतला असून, राज्य शासनानं तशी अधिसूचना जारी केली आहे.

****

आयसीसी महिला एकदिवसीय विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज भारत -ऑस्ट्रेलिया दरम्यान लढत होणार आहे. विशाखापट्टणम इथं दुपारी तीन वाजता हा सामना सुरू होईल. तत्पुर्वी या स्पर्धेत भारतीय महिला संघाने तीनपैकी आपल्या दोन सामन्यात विजय मिळवला आहे.

****